*बांधिलकी गुणवत्तेशी*

**हिन्दुस्तान फीड्स**

## प्रसुती होईल सुखकर खास दुध उत्पादन क्षमतेच्या उच्च पातळीसाठी हिन्दुस्तान फीड्सचे पशुखाद्य 'वात्सल्य'

**'हिन्दुस्तान फीड्स'** ही कंपनी ३० वर्षाहून अधिक काळ पशुखाद्य क्षेत्रात कार्यरत असून सर्व शेतकऱ्यांना सुपरिचित आहे. कंपनीचे सातारा, बारामती व श्रीरामपूर येथे अत्याधुनिक कारखाने असून वेगवेगळ्या पशुखाद्यांचा १५०० मेट्रिक टन प्रतिदिन इतका पुरवठा महाराष्ट्रात नियमितपणे केला जातो. प्रत्येक जनावरांसाठी पौष्टिक अन्नघटकांची गरज ही पूर्णत: वेगळी असते. जनावराची जात, उपलब्ध चारा, दूध येण्याची क्षमता, दुधातील फॅटचे प्रमाण, गाभणकाळ, वेतातील कालावधी इत्यादी बाबींवर या गरजा अवलंबून असतात. त्यानुसार अशा प्रकारच्या जनावरांसाठी **'हिन्दुस्तान फीड्स'**ने पशुखाद्यांची मालिकाच निर्माण केली आहे.

**'हिन्दुस्तान फीड्स'**ची उच्च प्रतीचे खाद्य तयार करण्याची असलेली परंपरा तसेच कंपनीच्या प्रदीर्घ अनुभव असलेला संशोधन विभाग यांनी खास दुधाळ गायी व म्हैशींच्या जीवनाच्या वेगवेगळ्या अवस्थांसाठी विशेष अशी पशुखाद्ये बनविलेली आहेत. **'हिन्दुस्तान फीड्स'** ने गोपालकाचे गायी व म्हैशी पालन किफायतशीर व्हावे, गायी-म्हैशींची प्रसुती सुखकर व्हावी तसेच अनुवंशिकतेनुसार जनावरांचे उच्च दूध उत्पादन मिळण्यासाठी गायींमध्ये नवव्या महिन्यापासून व म्हशींमध्ये दहाव्या महिन्यापासून ते प्रसुतीपश्चात दुभत्या कालावधीत एक महिन्यापर्यंतचे योग्य पोषण होण्यासाठी अभिनव असे **'वात्सल्य'** पशुखाद्य तयार करून बाजारात उपलब्ध आहे.

प्रदीर्घ संशोधनाने सिद्ध झालेले आहेत की, दुधाळ जनावरांच्या पालनपोषण व्यवस्थापनात, वेगवेगळी उत्पादन क्षमता असलेल्या जनावरांची आयुष्याच्या वेगवेगळ्या अवस्थेतील पौष्टिक अन्नघटकांची गरज ही वेगवेगळी असते. दुभत्या कालावधीत जनावरांची अन्नघटकांची गरज ही भाकड जनावरांच्या अन्नघटकांपेक्षा वेगळी असते. दुभत्यातील पहिले १०० दिवस, नंतरचे १००, शेवटचे १०० दिवस या वेगवेगळ्या अवस्थेत पोषणसत्वांची गरज बदलत राहते. दुध उत्पादन कार्यक्रमात जनावरांच्या आयुष्यात दुधाचे उत्पादन पुढे अखंड चालवण्यासाठी नैसर्गिक ऋतुचक्रानुसार जनावराला वेळोवेळी गाभण करावे लागते. तसेच शरीरातील अंतस्त्राव हे गर्भाशयाची वाढ व त्याचे पोषण पूर्णत्वाकडे नेण्याच्या दृष्टीने व प्रसुतीचा ताण सहन करण्यासाठी गायी म्हैशींचे शारीरिक तयारी करण्याच्या दृष्टीने बदलत असतात.

प्रसुतीच्यावेळी दुधात नसलेल्या व गाभण असलेल्या गायीचे, दुभत्या गाभण नसलेल्या गायीत परिवर्तन होते. प्रसुतीपूर्वी चाराखाद्यातून मिळणारा अन्नपुरवठा गर्भाशयाच्या वाढीसाठी शरीरात साठवला जात असतो. परंतु प्रसुतीनंतर शारीरिक चयापचयाच्या प्रक्रियेत फार मोठा बदल होऊन चारा पशुखाद्यातून मिळणारी पोषणसत्वे दुधाच्या रूपात गायी-म्हैशींकडून दिली जातात. तसेच प्रसुतीच्या पहिल्या काही आठवड्याच्या कालावधीत जनावरांच्या शरीरावर प्रचंड ताण निर्माण होतो. हा ताण इतका गंभीर स्वरूपाचा असतो की प्रसुती म्हणजे वासराच्या जन्माबरोबर जनावरांचा पुनर्जन्म झाल्यासारखे असते. या सर्व बाबींमुळे जनावरांची पचनक्षमता, एकूणच अन्नग्रहण क्षमता व चयापचय प्रक्रियेचे प्रसुतीपूर्व एक महिना व प्रसुती नंतर एक महिना नाजुक स्थितीतून परिवर्तन होत असते. या कालावधीत जनावरांचे योग्य ते पोषण संतुलित ठेवण्यासाठी काळजी घेतली नाही तर कोटीपोटातील पर्यावरण बदलून, जिवाणूंमधील संतुलन बिघडून चारा खाद्य पचवण्याच्या नैसर्गिक कार्यात बदल होतो. प्रसुती क्रियेत बाधा निर्माण होणे, वार अडकणे (Retained Placenta), गर्भाशयाचा दाह (Metritis), प्रसुतीनंतर कासेचा दाह (Mastitis), आम्ल धर्मीय रक्तक्षय (Ketosis), दुधक्षय (Milk Fever) इ. सारखे विकारांची बाधा होते आणि प्रतिकार शक्ती कमी होऊन कासेची तयारी व पूर्ण वाढ न झाल्याने दुधाच्या उत्पन्नात घट होते.

गाभण स्थितीत गायीच्या शरीरामधील वेगवेगळे आजार रोखण्याच्या दृष्टीने वेगवेगळे प्रयोग होऊन या कालावधीत करावयाच्या पोषण व्यवस्थापनाबद्धल निकष तयार झालेले आहेत. या निकषानुसार पशुखाद्य तयार करून जनावरांना पुरवठा केल्यास गाभण कालावधीतून प्रसूती व दुभत्या कालावधीत परिवर्तन सुखकर होऊन दुध उत्पादनात वाढ होऊन जनावरांचे प्रजनन ऋतुचक्र पुन्हा वेळेत सुरू होण्यास मदत होते. सध्याच्या परिस्थितीत जेव्हा जनावरांना वेगवेगळ्या प्रकारचा कमी प्रतवारीचा किंवा अपायकारक घटक असलेला चारा व खाद्ये पुरवली जाऊ शकतात. त्यावेळेस गाभण काळाकरिता खास बनवलेले **'वात्सल्य'** पशुखाद्य देऊन पोषण व्यवस्थापन सुधारणे गरजेचे ठरते.

### 'वात्सल्य' पशुखाद्याची गरज काय?

१. प्रसुतीपूर्वी एक महिनाआधी वासराची वाढ झाल्याने गायी-म्हैशींच्या पोटाचे आकारमान कमी झालेले असते त्याच वेळी वासराची वाढ होणे व प्रसुतीसाठी अधिक ऊर्जा मिळवणे याची जनावराला गरज असते.

२. प्रसुतीनंतर एक महिन्यात प्रसुतीच्या ताणामुळे आहार ग्रहण क्षमता कमी असते याउलट प्रसुतीदरम्यान शरिराची झालेली झीज भरून काढणे व उच्चतम दूध पातळी गाठणे याची जनावरास गरज असते.

३. अशावेळी कमी मात्रेत अधिक पोषणमुल्ये असलेल्या **'वात्सल्य'** पशुआहाराच्या वापराने वरील दोन्ही परिस्थितीमधील जनावरांची पोषणमुल्यांची गरज भागते.

### 'वात्सल्य' पशुखाद्याची वैशिष्ट्ये :

१) खास गायी व म्हैशींसाठी त्यांच्या प्रसुतीपूर्वी, प्रसुती दरम्यान व प्रसुतीनंतरच्या कालावधीसाठी बनवलेल्या या खाद्यामध्ये विविध प्रकारच्या पेंडी, विविध प्रकारची धान्ये, बायपास फॅट, मीठ, उसाची मळी, मॅग्नेशियम, कॅल्शियम, मिनरल्स इ. घटक आहेत. हे सर्व घटक खरेदी करताना उच्च प्रतीचे व पोषणमूल्ये समृद्ध असल्याची खात्री संस्थेच्या प्रयोगशाळेत विविध चाचण्या घेऊन केली जाते. कंपनीच्या स्वत:च्या अत्याधुनिक व सुसज्ज प्रयोगशाळेमध्ये त्यामधील पोषण-सत्वांची तपासणी केली जाते.

२) परिवर्तन कालावधीमध्ये **'वात्सल्य'** पशुआहारातील काही खास घटकांमुळे दुभत्याच्या सुरूवातीच्या काळात जनावरांच्या शरीरातील ऊर्जेचा समतोल सुधारतो. त्यामुळे ऊर्जेशी व तिच्या पुरवठ्याशी निगडीत असलेल्या आजारांची उदा. वार राहणे. (Retained Placenta), आम्लधर्मीय रक्तक्षय (ketosis), पोटातील वाट सरकल्यामुळे होणारी पोटदुखी (Abomasal Displacement) यासारख्या विकृतीची जोखीम कमी झाल्याने औषधोपचारावरील खर्च कमी होतो.

### 'वात्सल्य' पशुखाद्य वापरण्याचे प्रमाण :

गाय-म्हैस विल्यानंतर जास्तीत जास्त किती दूध उत्पादन करेल याचे अनुमान करावे. व तेवढ्या लिटरला प्रती लिटर ३०० ग्रॅमप्रमाणे गायीला व प्रती लिटर ५०० ग्रॅम प्रमाणे म्हैशीला विण्यापूर्वी एक महिना आधी सुरू करून खालील विशिष्ट प्रमाणापर्यंत पोहचावे. उदा : एखादी गाय उच्चतम दूध उत्पादन काळात प्रतिदिन २० लिटर दूध उत्पादन करत असेल तर तिला ६ किलो **'वात्सल्य'** पशुआहार द्यावा लागेल व एखादी म्हैस उच्चतम दूध उत्पादन प्रतिदिन ८ लिटर करत असेल तर तिला ४ किलो **'वात्सल्य'** पशुआहार द्यावा लागेल. वरील **'वात्सल्य'** पशुआहार हळुहळु खालील प्रमाणे वाढवावे.

| दुधाळ गाईसाठी | | | | | म्हैशींसाठी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ वा महिना | | | | | १० वा महिना | | | |
| आठवडा | १ ला | २ रा | ३ रा | ४ था | १ ला | २ रा | ३ रा | ४ था |
| **'वात्सल्य'** दैनिक मात्रा (किलोमध्ये) | १.५ | ३ | ४.५ | ६ | १ | २ | ३ | ४ |
| प्रसुतीनंतर एक महिन्यापर्यंत दैनिक **'वात्सल्य'** देण्याचे प्रमाण (ग्रॅममध्ये): | | | | | | | | |
| दैनिक मात्रा प्रतिलिटर | ३०० | | | | ५०० | | | |

### 'वात्सल्य' पशुखाद्य देण्याच्या कालावधीनंतर दुग्धोत्पादनात सातत्य ठेवण्यासाठी हिंदुस्तान फीड्सच्या दुसऱ्या दर्जेदार पशुखाद्यांचा वापर :

प्रसुतीपश्चात एक महिन्याच्या कालावधीपर्यंत उपरोक्त प्रमाणे **'वात्सल्य'** पशुखाद्य दिल्यानंतर गाई-म्हैशींच्या दैनिक दुग्धोत्पादन व चाऱ्याची उपलब्धता विचारात घेऊन आवश्यकतेनुसार दुधासाठी शिफारस केलेले हिरा, कोहिनूर, इंद्रनील, मोती, पुष्कराज इ. पशुखाद्य पुढे चालू करावीत. या पशुखाद्यांचे प्रमाण हे दुधाच्या उत्पादन क्षमतेनुसार वाढवत जावे. पशुखाद्य वापरामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल टप्प्याटप्प्याने ४ ते ५ दिवसात करावा.

### 'वात्सल्य' पशुखाद्य वापरण्याची पद्धत व गाभणकाळातील मार्गदर्शक सुचना :

- **'वात्सल्य'** खाद्याचे प्रमाण दोन भागात विभागून सकाळ आणि संध्याकाळी द्यावे.
- गाभण जनावर विल्यानंतर पहिल्या ३० ते ३५ दिवसात दूध उत्पादन वाढत जाते. गाई-म्हैशींनी आपल्या पूर्ण क्षमतेनुसार दूध देऊन प्रसुतीनंतर ६० ते ९० दिवसात माजावर येऊन गाभण राहण्याकरता सदरचे खाद्य वर नमूद केलेल्या प्रमाणात देऊन त्यासोबत हिरवा चारा १५ ते २० किलो आणि वाळलेला चारा ४ ते ५ किलो प्रतिदिन प्रति जनावरासाठी द्यावा.

- गाभण काळाचे दुभत्या काळात रूपांतर होत असताना शरीरातील संप्रेरकाच्या बदलामुळे प्रसुतीनंतर जनावरांची भूक ४ ते ६ आठवडे मंदावलेली राहते. या कालावधीत जनावरांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.
- गाभण काळातील ७ व्या महिन्यात योग्य ती जंतुनाशक व गोचिड नियंत्रण औषधे पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनानुसार द्यावीत.
- गाभण कालावधीत शेवटच्या १५ दिवसात जनावरांस फार वेळ बाहेर चरण्यास सोडू नये. त्यांना चारा व खाद्य गोठ्यात उपलब्ध करावे.
- विण्याच्या वेळेस लागणाऱ्या सर्व वस्तू औषधे खाद्य पाणी इ. ची तरतूद गोठ्यात आधीच करून ठेवावी म्हणजे जनावराची प्रसुती सुखकारक करण्यास मदत होते.

**पॅकिंग :** **'वात्सल्य'** हे खाद्य गोळीच्या स्वरूपात उपलब्ध असून ५० किलोच्या लॅमिनेटेड प्लॅस्टिक बॅगमध्ये बाजारात शेतकऱ्यांसाठी उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी सोबत दिलेल्या ग्राहक सेवा केंद्र संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा.

**साठवणूक :** **'वात्सल्य'** पशुखाद्याची साठवणूक ही थेट सुर्यप्रकाशापासून दूर, थंड, बंद व कोरड्या जागेत करावी, जेणेकरून साठवलेल्या ठिकाणी आर्द्रता व तापमान कमीत कमी राहून पशुखाद्याची साठवणूक चांगली होईल. पशुखाद्यास कोणत्याही प्रकारे ओलावा लागणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे, यामुळे पशुखाद्याचे बुरशीपासून संरक्षण होते.

**महत्त्वाची सुचना :** **'वात्सल्य'** हे पशुखाद्य वेळोवेळी आवश्यक त्या प्रमाणात खरेदी करावे. त्यामुळे त्यामधील पोषणमुल्याचा ऱ्हास होत नाही. **'वात्सल्य'** पशुआहाराचा वापर घोडा, कुत्रा, मांजर व इतर दुसऱ्या प्राण्यांसाठी करू नये. तसेच मनुष्यांना देखील हे खाद्य हानीकारक आहे.



**पशुखाद्य निर्मितीमध्ये नं. 1**




**गायी–म्हैशींच्या प्रसुतीच्या अतिसंवेदनक्षम काळातील पोषणासाठी सर्वोत्कृष्ट किफायतशीर पशुआहार**

*बांधिलकी गुणवत्तेशी*

**हिन्दुस्तान फीड्स**


**सातारा युनिट :**
एल–४, ॲडिशनल एम.आय.डी.सी., सातारा – ४१५००४.
फोन : ०२१६२–२४०४७१/२/५
ग्राहक सेवा क्रमांक : ०२१६२–२४०७७३
मोबाईल : ९०११०१२७६२
ईमेल : marketing.str@hindustanfeeds.com

**बारामती युनिट :**
ई–२४८, एम.आय.डी.सी., बारामती, पुणे – ४१३१३३
फोन : ०२११२–२४३८३४, २४३६३४, २४३६८२
ईमेल : marketing.bmt@hindustanfeeds.com

**श्रीरामपूर युनिट :**
ई–५, एम.आय.डी.सी., श्रीरामपूर, अहमदनगर – ४१३७०९
मोबाईल : ९८२२५३३३५७/७४४७७९५७४७
ईमेल : marketing.srm@hindustanfeeds.com


*बांधिलकी गुणवत्तेशी*

**हिन्दुस्तान फीड्स**

# 'वात्सल्य पशुआहार'

**गायी–म्हैशींच्या प्रसुतीच्या अतिसंवेदनक्षम काळातील पोषणासाठी सर्वोत्कृष्ट किफायतशीर पशुआहार**






**पशुखाद्य निर्मितीमध्ये नं. 1**